# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी कार्यालय, औरंगाबाद,

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत फाजलपुरा औरंगाबाद

दुरध्वनी क्र. 0240-2331211/ Fax No. 0240-2338394, email id - expcellhq@gmail.com


जा.क्र.जिकअ/नि.खर्च नि कक्ष/2019/ 180 दिनांक :- 21/04/2019

## नोटीस

प्रति,

**श्री हर्षवर्धन रायभान जाधव**

मु.पो.पिशोर, ता. कन्नड, जि.औरंगाबाद

**विषय :- 19-औरंगाबाद लोकसभा सर्वसाधारण निवडणूक 2019**

मा. निवडणूक खर्च निरीक्षकामार्फत निवडणूक लढविणाऱ्या उमदेवारांचा दैनंदिन खर्च लेखा तपासणी बाबत.

संदर्भ :- 1. निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019

2. Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87

3. या कार्यालयाचे पत्र क्र.146 दिनांक 09.04.2019 ( तपासणी वेळापत्रक)

वरील संदर्भीय विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमदेवारांनी लोकप्रतिनिधी अधिनियम 1951 चे कलम 77 नुसार निवडणूकीतील प्रत्येक उमेदवारास नामनिर्देशन दाखल केल्याच्या दिनांकापासुन ते निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याचा दिनांक हे दोन्ही दिवस धरुन होणाऱ्या कालावधीच्या दरम्यान निवडणूकीच्या संबंधात उमेदवास किंवा उमेदवाराच्या प्रतिनिधीला सर्व खर्चाचा स्वंतत्र व यथातथ्य हिशोब ठेवणे आवश्यक आहे. तसेच निवडणूक खर्चाचे नियंत्रण करण्यासाठीचे सारसंग्रह माहे फेब्रुवारी 2019 व Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 नुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी मतदान होई पर्यंतच्या कालावधी पर्यंत दैनंदिन खर्चाचा लेखा तीन वेळा मा.निवडणूक खर्च निरीक्षकाकडुन तपासणी करुन घेणे आवश्यक आहे तथापि दिनांक 20.04.2019 रोजी करण्यात आलेल्या तृतीय तपासणीमध्ये दिनांक 12/04/2019 ते 15/04/2019 या कालावधीचे आपणाकडील खर्चाचे लेखे तपासणी केले असता,

1. दैनंदिन खर्च दि. 15.04.2019 पर्यंतच सादर केलेला आहे.तथापी दि. 19.04.2019 पर्यंत सादर केलेला नाही.
2. आपणाकडील लेखे आणि खर्च नियंत्रण कक्षाने परिरक्षित केलेली अभिरूप निदर्शनास नोंदवही (SOR) याचा ताळमेळ घेतला असता रक्कम रू. 2,92,685/- एवढा विविध बाबींचा खर्च कमी दर्शविला असल्याचे आढळून आले आहे.
3. जाहिरात परवानगी सोबतच्या MCMC अहवालानुसार रू. 2,79,600/- आपल्या खर्चात (E-1) मध्ये दर्शविल्याबाबत पृष्ठ क्रमांकासह खुलासा करावा.

तेव्हा सदर बाब ही Conduct of Election Rule 1961 मधील नियम 87 चा भंग करणारी आहे. तेव्हा या नोटीसीव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, या सदंर्भात आपला खुलासा ही नोटीस प्राप्त झाले पासून 48 तासाच्या आत या कार्यालयाकडे सादर करावा अन्यथा आपणा विरुध्द भा.द.वि 1860 चे कलम 171 (I) नुसार मा.सक्षम न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची गांर्भियाने नोंद घ्यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**निवडणूक निर्णय अधिकारी**

**19-लोकसभा मतदार संघ औरंगाबाद**

प्रत

1. जिल्हा माहिती अधिकारी यांना देवून कळविण्यात येते की, सदरील नोटिसची व्यापक प्रसिध्दी स्थानिक वर्तमान पत्रात देण्यात यावी.
2. जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (NIC) औरंगाबाद यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3. सुचनाफलक.

Scanned by CamScanner